25 Dr. Irlapalle

Indo Asian Social Science Research Journal (IASSRJ) (42)

IMPACT FACTOR 6.10
ISSN 2393-8412

Indo Asian Social Science Research Journal (IASSRJ)
Issue : XVI, Vol. II
Feb. 2022 To July 2022
www.irasg.com

Research Paper 10 Public Adminitration

# रोजगार हमी योजना व ग्रामीण विकास

डॉ. पल्लवी भगवंतराव इरलापल्ले
लोकप्रशासन विभाग प्रमुख,
वसंतदादा पाटील महाविद्यालय, पाटोदा, जि. बीड

प्रस्तावना :-

महाराष्ट्र रोजगार हमी योजना ही जगामध्ये अद्वितीय आहे. कोणतेही कौशल्य, शिक्षण अंगी नसलेल्या सामान्य मजूराला हक्काने काम देऊन स्वाभिमानाने जगण्याची हिम्मत देत असतानाच नकळतपणे त्यांच्या श्रमशक्तीचा उपयोग करुन वाढती लोकसंख्या हे संकट न समजता देशाची नैसर्गीक साधनसंपत्ती वाढवणारी व कायमस्वरुपी उत्पन्न देणारी मालमत्ता तयार करणारे साधन समजून देशाच्या कृषी व ग्रामीण विकासाबरोबरच सामान्य मानसाच्या चेहऱ्यावर हसू फुलवणारी व धरतीमातेला विविधतेने नटवणारी तसेच सामाजिक समतेची संपत्तीच्या समान वाटपाची प्रकाशमय ज्योत घेवून निघालेली योजना म्हणून रोहयोचा गौरव केला जातो. नविन आर्थिक धोरणामुळे निर्माण झालेल्या जागतिक स्वरुपाच्या स्पर्धेमध्ये कल्यानकारी राज्याचा मानबिंदू म्हणून महाराष्ट्राचा नावलौकिक सातासमुद्रापलीकडे घेवून जाण्याचे कार्य महाराष्ट्र रोजगार हमी योजनेने केले आहे.

कोणत्याही इतर योजनांना शक्य झाली नाहीत अशी आपली नियोजीत उद्दिष्टये पुर्ण करुन कृषी, जलसंवर्धन, वनीकरण, रस्त्याची, जमिन सुधारणा विषयक अशी कामे करुन मजुरांचा मुलभूत प्रश्न तर सोडवलांच परंतू त्यामाध्यमातून सामाजिक, भौगोलिक, कृषीविषयक आर्थिक पर्यावरणविषयक अशा विविध क्षेत्रामध्ये विकास या योजनेने घडवून आणला आहे. त्यामुळेच केंद्र सरकारने काही किरकोळ बदल करुन ही योजना देशभर सन २००५ पासून लागू केली आहे.

**रोहयोची निर्मिती :-**

महाराष्ट्रामध्ये पर्जन्यछायेचा एक पट्टा धुळयापासून ते सोलापूरपर्यंत उत्तर दक्षिण असा कापत जातो. त्यामुळे राज्याच्या या पर्जन्यछायेतील व त्यांच्या आजूबाजूचे असे अनेक तालुके आवर्षनग्रस्त आहेत. त्यामुळेच महाराष्ट्रात वारंवार दुष्काळ पडतो. महाराष्ट्रातील एकूण जमिनीपैकी केवळ ०९ टक्के जमिन १९७४ पर्यंत सिंचनाखाली होती. अजुनही हे प्रमाण १३ टक्क्याच्यावर गेलेले नाही त्याचप्रमाणे दुहेरी पिकाखालील जमिन ही जवळपास ५ ते ७ टक्क्याच्या आसपास आहे. राज्यातील एकूण ग्रामीण कुटूंबापैकी २१ टक्के लोक हे भूमिहीन आहेत. आणि त्यापेक्षा अधिक लोक दोन हेक्टरपेक्षा कमी जमिन

असलेले अल्पभूधारक आहेत त्यामुळे कोठे ना कोठे दरवर्षी पावसाचा फटका बसला की लक्षावधी लोकांना अवर्षनामुळे हालअपेष्टांना तोंड दयावे लागते. कित्येक लोक गुरे अन्नपाण्यावाचून मृत्यूमुखी पडल्याची उदाहरणे आहेत. निसर्गाच्या या दुष्टचक्राला तरी मानुस थांबवू शकत नाही परंतु त्यातुन उपाय शोधून लोकांना जगवणे हे कल्यानकारी राज्याचे कर्तव्य असते म्हणून अनेक जनहिताच्या योजना लोकांसाठी निर्माण केल्या गेल्या पण अपेक्षीत यश मिळाले नाही.

परंतु वि.स. पागे यांच्या प्रेरणेने सांगली जिल्हयामध्ये प्रायोगिक तत्वावर सुरु केलेल्या रोजगार हमी योजनेला आलेले यश विचारात घेवून व १९७२ मध्ये पडलेल्या दुष्काळाला तोंड देण्यासाठी मे १९७२ मध्ये महाराष्ट्रात रोजगार हमी योजना सुरु केली व तीला१९७७ मध्ये कायदयाचे रुप देवून Maharashtra Employment Guarantee Act. १९७७ तयार केला व त्याची २६ जानेवारी १९७९ पासून अंमलबजावणी करण्यात आली आहे.

**रोजगार हमी योजनेचे उद्दिष्टे :-**

रोजगार हमीयोजनेची सुरवात करताना खालील तीन प्रमुख उद्दिष्ट निश्चित केले आहेत.

१. ग्रामीण भागातील अकुशल कामगारांना काम पुरवणे

२. ग्रामीण जनतेचे दरडोई उत्पन्न वाढवणे.

३. कायम उत्पन्न देणारी उत्पादक साधनसंपत्ती निर्माण करणे

वरील तीन प्रकारची मुख्य उद्दिष्ट निश्चित केले आहेत परंतु काळाच्या ओघात त्याची व्याप्ती वाढुन ग्राणीण विकास हे उद्दिष्ट ठरल्याचे दिसते.

**रोजगारहमी योजनेसाठी वित्तीय तरतूद :-**

रोहयो अखंडीतपणे चालु रहावी वित्तीय अडचण भासू नये म्हणून नियमित उत्पन्नाचा स्त्रोत चालु ठेवण्यासाठी पुढील प्रकारच्या विविध करांच्या माध्यमातून वित्तीय तरतूद केली आहे.

१. रोहयोसाठी व्यवसाय, व्यापार अजिवीका व सेवा योजना यावरील कर.

२. वाहनांवरील अतिरिक्त कर

३. विक्रीकरांवरील अतिरिक्त कर

४. रोहयोसाठी जमिन महसूलावरील सरचार्ज

५. नागरी विकासोत्तर जमिनीवरील कर,सिंचीत जमिनीवरील रोहयो कर

६. सिंचित जमिनीवरील रोहयो कर

७. वरील करांद्वारे मिळालेल्या उत्पन्नावएवढीच रक्कम राज्य शासन रोहयो निधीमध्ये अशंदान म्हणून जमा करते.

श्रमशक्तीतून ग्रामविकास साधण्यासाठी पैसा कमी पडू नये म्हणून वरील प्रकारे नियमीत निधी उपलब्ध केला जातो.

*** रोहयोच्या कामाचे स्वरुप :-**

रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून हाती घेण्यात आलेल्या कामाचे स्वरुप व्यक्तीला उपयुक्त व राज्याच्या अर्थव्यवस्थेला उत्पादक असा रोजगार व विकासाला पुरक अशी उत्पादक कामे केली जातात ज्यामध्ये राज्यातील दुष्काळाची पुनरावृत्ती कमी करण्यासाठी ग्रामीण विकासासाठी खालीलप्रकारची कामे

केली जातात.

१. जलसंधारनाची कामे
२. मृदसंधारण व भूमिविकास.
३. कृषीविषयक कामे
४. वनीकरण व सामाजिक वनीकरण
५. रसत्याची विकास आराखडयानुसार कामे गावातील अंतर्गत रस्ते
६. दुष्काळ परिस्थितीमध्ये आवश्यकतेनुसार इतर कामे.

रोहयोच्या वरील कामात जलसंधारनाच्या व मृदसंधारनाच्या कामांना विशेष प्राधान्य दिले जाते.

*** रोहयोचा नैतिक दृष्टीकोन किंवा कामावरील सुविधा :-**

रोहयोच्या कामावर येणाऱ्या मजुरांना पिण्याचे पाणी, विश्रांतीसाठी शेड, प्रथमोपचार पेटी, लहान मुलांना सांभाळण्यासाठी दायी पाळणाघर, कामासाठी हत्यारे, याची सोय केली जाते. तसेच प्रसुतीकाळात महिलांना पगारीरजा दिली जाते.कामावर मृत्यू झाल्यास किंवा अपंगत्व आल्यास नुकसानभरपाईसुध्दा दिली जाते.

*** जागतिकीकरण आणि रोहयो :-**

रोजगार हमी योजना सुरु झाली तेंव्हा जागतिकीकरण हा शब्ददेखील फारसा परिचित नव्हता पण आज जागतिकीकरणाच्या वाऱ्याने इंजाबाताचे रुप धारण केले आहे. खाजगीकरणाच्या अपरिहार्यतेने जास्तीत जास्त मजुरांना काम देणारे उद्योग सरकारने उभे करणे आणि चालवणे हे कालबाहय व जागतिकीकरणाच्या स्वभावासी विसंगत असल्याचे दिसुन येते. सरकारने निर्गुंतवणूकिचे धारेण अवलंबून सार्वजनिक उदयोगांचे खाजगीकरण करण्याचा सपाटा चालवला आहे. तसेच खाजगी क्षेत्रामध्ये अकुशल कामाचे प्रमाण कमी झाले आहे. त्यामुळे लाखो लोकांच्या हाताला काम नाही. यंत्रयुगाचा व जागतिकीकरणाचा पगडा व खाजगीकरण यामुळे जागतिक पातळीवर अकुशल व कुशल लोकांच्या जागी दर्जेदार कामे करणाऱ्या तसेच वेळ व पैसा कमी लागणाऱ्या यंत्रणा आल्या आहेत बहूराष्ट्रीय कंपन्यांनी, कंत्राटदारांनी सर्व कामाची क्षेत्रे व्यापली असतानाही रोहयोने महाराष्ट्रामध्ये कल्यानकारी व्यवस्था टिकवून ठेवली त्यामुळे २१ व्या शतकातही पथदर्शक ठरणारी योजना ठरली आहे. जागतिकीकरणाच्या व खाजगीकरणाच्या काळातही गरिबांसाठी सामाजिक आर्थीक न्याय देण्याच्या शासकीय पुरोगामी योजनांना स्थान मिळू शकते. हे महाराष्ट्राने दाखवून दिले आहे.

**रोहयोचे महत्व :-**

रोजगार हमी योजनेने नियोजीत उद्दिष्टांबावत बऱ्यापैकी यश (काही अपवाद वगळता)मिळवले पण त्यापलीकडे जावून सामाजिक क्रांती घडवून आणली आहे रोहयोमुळे अन्नधान्य उत्पादनात वाढ ण मजुरांना मिळणाऱ्या मजुरीत वाढ ग्रामीण कर्जबाजारीपणात घट, जातीयवाद, अस्पृश्यता कमी सामाजिक विषमता कमी मजुरांचे शंहरांकडे होणारे स्थलांतर थांबले 'गांवी ...

कोणत्याही योजनेमध्ये शहरी व ग्रामीण भागातील उत्पन्न व रोजगाराची संधी यामधील विषमतेसारख्या व्यापक समस्येला हात घातला नव्हता.

महाराष्ट्राची रोजगार हमी योजना तिच्या अंमलबजावणीतील थोडा अपूरेपना व गैरव्यवहाराच्या काही चुका गृहित धरुनही ग्रामीण भारताचा कायापालट घडवून आणनारी एकमेव क्रांतीकारी योजना आहे असे अनेक तज्ञ मानतात. म्हणूनच थोडेफार बदल करुन देशभर या योजनेचा विस्तार केंद्र शासनाने केला हेच सर्वात मोठे यश रोहयो चे मानले पाहिजे.

बेकार हातांना काम देवून त्यांच्या जगण्याचा प्रश्न सोडवण्याबरोबर त्यांचा सामाजिक दर्जा उंचावण्याचा व स्वाभिमान जागवण्याचे कार्य रोहयोने केले आहे. म्हणून जगात अद्वितीय अशी ही महाराष्ट्र राज्याची योजना आहे. साम्यवादी देशांमध्ये संपत्तीच्या पुनर्वाटपासाठी सक्तीचे मार्ग अवलंबिले जात असत. गतशतकामध्ये भांडवली व्यवस्थेतील जागरुक लोकशाही देशांना हळूहळू कल्यानकारी राज्याची संकल्पना थोडयाफार फरकाने स्विकारावी लागली ही भांडवलशाही राष्ट्रे साधनसंपत्तीचे पुनर्वाटप विषमतेचे निर्मूलन आणि समानतेचे प्रस्थापन या संकल्पनांना निश्चितच बांधील नाहीत. पण दारिद्रय निर्मूलनाचे मुल्य त्यांनी स्वीकारले आहे. बहूतेक देशांमध्ये यासाठी बेकारांना बेकारभत्ता देण्याचा मार्ग स्वीकारला जातो. भारत हे लोकशाही राष्ट्र असून त्याने सुरवातीला मिश्र अर्थव्यवस्थेचा मार्ग पत्करला होता. समाजवादी बांधिलकीमध्ये दारिद्रयनिर्मुलन, विषमता निर्मुलन, संपत्तीचे फेरवाटप या संकल्पना होत्या त्यांच्या अंमलबजावणीचा सकारात्मक व उत्पादक मार्ग रोजगार हमी योजना दाखवते. यामध्ये साम्यवादातील सक्ती नाही आणि बेकारभरत्यासारखी आत्मसन्मानाशी तडजोड करुन लाचारी पत्करण्याचा प्रसंगही नाही या योजनेने १९७९ मध्ये कायदयात रुपांतर झाले तेंव्हा मजुरांना काम मागण्याचा हक्क देण्यात आला. बेकार हातांना काम देण्याची जबाबदारी शासनावर टाकण्यात आली हे निश्चितच क्रांतीकारी पाऊल होते आज ही योजना केंद्रसरकारसाठी व जगासाठी पथदर्शी ठरली आहे.

**राजेगार हमी योजनेने मिळवलेल्या यशासंबंधीच्या ठळक बाबी.**

१. महाराष्ट्र रोजगार हमी योजनेमुळे कष्टकरी शेममजूरांनी वर्षभर रोजगार मिळाल्यामुळे दुष्काळाची भिती संपली.

२. सिंचनाच्या साधनांची निर्मिती होऊन कृषी उत्पादनात वाढ झाली.

३. कायमस्वरुपी उत्पादन देणारी नैसर्गीक मालमत्ता/साधने निर्माण झाली.

४. ग्रामीण भागात रस्त्यांचे जाळे निर्माण होऊन दळणवळणाच्या साधनांमध्ये वाढ झाली.

५. मजुरांना नियमित मजुरी मिळाल्यामुळे त्यांच्या सामाजिक आर्थिक, राजकीय, शैक्षणीक, सांस्कृतीक, विकासाला चालना मिळाली.

६. वनीकरणाच्या कामामुळे पर्यावरण संतुलनाबरोबर जंगलातून मिळणारी विविध उत्पादने वाढली. (फळे, डिंक, लाकूड, वन औषधी व इतर).

७. आर्थिक उत्पन्न वाढल्यामुळे सावकारी पाशातून सामान्य नागरीकांची मुक्तता झाली.

८. मजुरांना आपल्या घटनात्मक अधिकाराची जानीव झाली व जगण्यासाठीचा संघर्ष संपला.

९. शहरांकडे होणारे मजुरांचे स्थलांतर थांबले.

१०. संपत्तीचे श्रीमंतांकडून गरीब मजूरांकडे संक्रमन झाले

११. विविध जातीधर्माचे लोक एकत्र रोहयोवर काम करु लागल्यामुळे जातीभेद, अस्पृश्यता कमी होऊन सामाजिक समता निर्माण झाली.

१२. महाराष्ट्राचा आदर्श घेऊन केंद्रसरकारने सर्व राज्यांमध्ये रोहयोचा विस्तार केला.

अशाप्रकारे रोजगार हमी योजना जनकल्याणाची व सामाजिक समतेची वाहक आहे असे म्हणावे लागेल.

## संदर्भ सूची :-


१) महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम-१९७७, महाराष्ट्र शासन

२) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम २००५, महाराष्ट्र शासन

३) रोहयो सारग्रंथ खंड क्र. १,२,३,नियोजनविभाग, मंत्रालय मुंबई

४) संगणक वेबसाईट www.mahaegs.nic.in

५) महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना, महाराष्ट्र शासन शासनाचे महत्वाचे निर्णय संग्रह, जून २००८

६) लोकराज्य मासीक, मे २००२, माहिती व जनसंपर्क मंत्रायल, मुंबई

७) लोकराज्य मासीक, जुलै २००५ , माहिती व जनसंपर्क मंत्रायल, मुंबई

८) लोकराज्य मासीक, एप्रिल २००६ , माहिती व जनसंपर्क मंत्रायल,मुंबई

९) स्पर्धा परिक्षा नोकरी संदर्भ सप्टेंबर २००४,